आपल्या परिसरातील ताज्या घडामोडींसाठी
Deshdoot Media Group
आजच डाऊनलोड करा, देशदूतचे मोबाईल ॲप !
ॲप डाऊनलोड करण्यासाठी
क्यूआर कोड स्कॅन करा !

शिल्पकार विकासाचा...

# देशदूत

**पान २**
पडसाद : माणिकराव, शेतकऱ्यांना दिलासा द्या...!
**पान ३**
वीस हजार शेतकऱ्यांना १४५ कोटींचा लाभ
नाशिक जि. प. विभागात प्रथम
**पान १०**
सात लाखांचा दंड वसूल
खुनाच्या गुन्ह्यातील तिघे ताब्यात

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | **नाशिक** | वर्ष ५६ । अंक २६० । बुधवार, दि. २८ मे २०२५ । पाने १२ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा Android व Apple वर

## संपादकीय

### बदल अपरिहार्य

एआय तथा कृत्रिम बुद्धिमत्तेविषयीचे आश्चर्य अजूनही ओसरलेले नाही. तथापि तिच्यामुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांचा वेध घेऊन त्यावर उपाययोजनांचा शोध घेण्याची प्रक्रिया मात्र हळूहळू वेग घेत आहे. शिक्षण, व्यवसाय किंवा उदरनिर्वाहाच्या विविध क्षेत्रांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यास शिकणे मानवासाठी अपरिहार्य आहे. त्यासाठी माणसाला त्याच्या कार्यपद्धतीत बदल करावे लागतील, असा सूर एका परिषदेत वक्त्यांनी व्यक्त केला. त्यातील मतितार्थ प्रामुख्याने संशोधक आणि तज्ज्ञांनी लक्षात घेण्याची गरज आहे. तंत्रज्ञानाच्या बाबतीत समाजात मोठ्या प्रमाणात निरक्षरता आढळते. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे काय हे सामान्य माणसांच्या लक्षात येईलच असे नाही किंवा आले तरी कदाचित त्याला उशीर झालेला असू शकेल. तेव्हा कृत्रिम बुद्धिमत्ता आणि अन्य डिजिटल साधनांच्या वापराची हातोटी शिकणे, तिचा दैनंदिन कामात वापर करणे आणि त्यासाठीचे प्रयोग युवांनी करावेत यासाठी अभ्यासक आणि तज्ज्ञांना पुढाकार घ्यावा लागेल. उदाहरणार्थ, काही डिजिटल साधनांचा वापर भाषा शिकण्याचे साधन म्हणून केला जाऊ शकेल. अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता किंवा अन्य डिजिटल साधन तंत्रज्ञानाच्या फारशा खोलात न जाता त्याचा वापर करून घेणारे बदल हळूहळू दृष्टिपथात येतात. सातारा, सर्कलवाडी येथील एका शेतकऱ्याने कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने डाळिंब शेती करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. शेतीची अनेक कामे सोपी होऊ शकतील, अशी अपेक्षा त्यांनी माध्यमांकडे व्यक्त केली. चेरीची झाडे कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून हिरवीगार ठेवण्याचे प्रयत्न जपानमध्ये सुरू आहेत. शेती क्षेत्रातील अनेक कामे सोपी होऊ शकतील याकडे तज्ज्ञ लक्ष वेधून घेतात. हे वानगीदाखलचे उदाहरण आहे. अन्य क्षेत्रात या साधनांच्या वापरावर, त्यात सुरू असणाऱ्या जगभरातील प्रयोगांवर तज्ज्ञ माध्यमांत लिहित आहेत. त्याची माहिती माणसांनीदेखील घ्यायला हवी. अर्थात, असे शोध मानवापुढे वेगवेगळे प्रश्न निर्माण करेल. त्यामुळे बेरोजगारीची भीती व्यक्त होते. तज्ज्ञही ती नाकारत नाहीत. तथापि शोध लागतच राहतील. ते टाळणे सामान्य माणसांच्या हातात नाही हे जरी खरे असले तरी यासाठीच्या माहितीचा स्रोत माणूसच असतो. त्यामुळे त्याच्या परिणामांचा अंदाज माणूसच घेऊ शकतो याकडे तज्ज्ञ लक्ष वेधून घेतात. तंत्रज्ञानाच्या बदलत्या काळाचा वेध घेऊन तशी कौशल्ये प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करणे मात्र माणसांच्याच हातात आहे.

# यंदा मुसळधार

- दुष्काळाची दोन टक्के शक्यता
- भारतीय हवामान विभागाचा अंदाज

## देशात सरासरी १०६ टक्के पाऊस; महाराष्ट्रावर जास्त परिणाम



**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

देशात यंदा मान्सून चांगला बरसणार आहे. जून महिन्यात देशात सरासरीच्या १०६ टक्के पावसाचा अंदाज आहे. पावसाच्या पाण्यावर शेती अवलंबून असलेल्या भागातही यंदा चांगला पाऊस पडणार आहे. राज्यात जून महिन्यात सरासरीपेक्षा जास्त पावसाची शक्यता आहे, असा अंदाज हवामान विभागाने दिला.

हवामान विभागाचा मान्सून हंगामाचा सुधारित अंदाज मंगळवारी (दि.२७) पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सचिव डॉ. एम. रविचंद्रन, हवामान विभागाचे महासंचालक मृत्युंजय मोहपात्रा यांनी नवी दिल्लीत घेतलेल्या पत्रकार परिषदेत मान्सून हंगामातील सुधारीत दीर्घकालीन अंदाज जाहीर केला. हवामान विभागाने मान्सून काळातील पावसाच्या अंदाजित टक्केवारीत वाढ केली आहे. एप्रिल महिन्याच्या अंदाजात १०५ टक्के पावसाचा अंदाज होता. सुधारित अंदाजात हवामान विभागाने जून ते सप्टेंबर म्हणजेच मान्सून काळात १०६ टक्क्यांपेक्षा अधिक पावसाचा अंदाज दिला. मान्सूनमध्ये सरासरीपेक्षा जास्त पावसाची शक्यता ३२ टक्के तर दुष्काळाची शक्यता फक्त दोन टक्के असल्याचे सुधारीत अंदाजात स्पष्ट केले आहे.

मान्सून काळात देशात सरासरी ८७ सेंटीमीटर पाऊस पडत असतो. २०२५ च्या मान्सून हंगामात मध्य भारत आणि दक्षिण भारतात सरासरीपेक्षा अधिक पावसाचा अंदाज आहे. मध्य भारत आणि दक्षिण भारतात सरासरीच्या १०६ टक्क्यांपेक्षा अधिक पावसाचा अंदाज आहे. महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात, छत्तीसगड, ओडिशा, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू, आंध्र प्रदेशमध्ये १०६ टक्क्यांपेक्षा अधिक पावसाचा अंदाज आहे. पूर्व मध्य भारतातील राज्यांमध्ये मान्सून हंगामात सरासरी पावसाचा अंदाज आहे. उत्तर प्रदेश, राजस्थान, हरियाना, पंजाब, उत्तराखंड, हिमाचल प्रदेशात यंदा सरासरी पावसाचा अंदाज आहे. या राज्यांमध्ये सरासरीच्या ९२ ते १०८ टक्क्यांच्या दरम्यान पाऊस पडू शकतो, असा अंदाज हवामान विभागाने दिला आहे.

### ईशान्य भारतात सरासरीपेक्षा कमी

ईशान्य भारतातील राज्यांमध्ये यंदा सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज आहे. तसेच बिहार, आसाम, अरुणाचल प्रदेश, मेघालय, नागालँड, मिझोराम, मणिपूर राज्यात सरासरीच्या ९४ टक्क्यांपेक्षा कमी पावसाचा अंदाज आहे.

### ला निना, एल निनोची स्थिती नाही

विषुववृत्तीय प्रशांत महासागराचे तापमानही सरासरीइतकेच आहे. ते सध्या तटस्थ स्थितीत आहे. ला निना किंवा एल निनोच्या स्थितीत नाही. त्यामुळे मान्सून हंगामातही ही स्थिती कायम राहू शकते. बंगालचा उपसागर आणि अरबी समुद्रातील तापमानाचा फरकही तटस्थ आहे. हा फरक मान्सूनच्या दुसऱ्या टप्प्यात कमी होण्याची शक्यता असली तरी त्याचा फारसा परिणाम होणार नाही, असे हवामान विभागाने स्पष्ट केले आहे.

### जूनमध्ये उत्तर महाराष्ट्रात अधिक पाऊस

जूनमध्ये महाराष्ट्रातील बहुतांश भागात सरासरीपेक्षा जास्त पावसाची शक्यता आहे. तर उत्तर महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण अधिक असू शकते, असे हवामान विभागाने म्हटले आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि पश्चिम विदर्भात पावसाचे प्रमाण अधिक राहण्याची शक्यता आहे.

### महाराष्ट्राचा विभागवार अंदाज

| विभाग | अंदाज सरासरी पाऊस |
|---|---|
| कोकण | १०७ टक्क्यांपेक्षा अधिक |
| मध्य महाराष्ट्र | ११० टक्क्यांपेक्षा अधिक |
| मराठवाडा | ११२ टक्क्यांपेक्षा अधिक |
| विदर्भ | १०९ टक्क्यांपेक्षा अधिक |

## सावरकरांच्या गीताला पुरस्कार



सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने यंदा सुरू केलेला छत्रपती संभाजी महाराज राज्य प्रेरणागीत पुरस्कार स्वातंत्र्यवीर सावरकर लिखित 'अनादि मी अनंत मी' या गीताला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते देण्यात आला. वर्षा निवासस्थानी झालेल्या या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आशिष शेलार, सावरकर प्रतिष्ठानचे रणजित सावरकर, अशिलता राजे, स्वप्निल सावरकर, मंजिरी मराठे, अविनाश धर्माधिकारी आदी उपस्थित होते.

## पीओके ताब्यात घेण्यासाठी सरदार पटेल आग्रही होते : पंतप्रधान मोदी

**गांधीनगर । वृत्तसंस्था**



पाकव्याप्त जम्मू-काश्मीर ताब्यात घेण्यासाठी भारताचे पहिले गृहमंत्री सरदार पटेल आग्रही होते. जोपर्यंत पाकव्याप्त जम्मू-काश्मीर ताब्यात येत नाही तोपर्यंत लष्करी कारवाई थांबवण्यात येऊ नये, असे त्यांचे मत होते. मात्र त्यांच्या सल्ल्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. त्यामुळे आज ७५ वर्षांनंतरही आपण दहशतवादाचा सामना करत आहोत, अशी आठवण सांगत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर टीकास्त्र सोडले.

गांधीनगर येथे आयोजित सभेत ते बोलत होते. सभेपूर्वी रोड शो झाला. सभेला संबोधित करताना मोदी म्हणाले की, पाकव्याप्त काश्मीर ताब्यात घेण्याची त्यावेळी संधी गमावली. दहशतवाद ही पाकिस्तानची सुनियोजित युद्धनीती आहे. १९४७ मध्ये भारत मातेचे तुकडे झाले. खरे तर साखळदंड तुटायला हवे होते. मात्र, हात कापले गेले. देशाचे तीन तुकडे करण्यात आले आणि त्याच रात्री काश्मीरच्या भूमीवर पहिला दहशतवादी हल्ला झाला. पाकिस्तानने दहशतवाद्यांच्या मदतीने मुजाहिदीनांच्या नावाखाली भारत मातेच्या एका भूभागावर कब्जा केला. जर त्याच दिवशी त्या मुजाहिदीनांना कंठस्नान पान १० वर

## प्राप्तिकर विवरणपत्रासाठी १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

केंद्र सरकारच्या महसूल विभागाच्या केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाने आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी आयकर विवरणपत्र भरण्याची अंतिम तारीख वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. पूर्वी ही अंतिम तारीख ३१ जुलै २०२५ होती, जी आता १५ सप्टेंबर २०२५ पर्यंत वाढवण्यात आली आहे. सीबीडीटीने प्रसिद्धीपत्रक काढून यासंदर्भातील माहिती दिली आहे.

असेसमेंट वर्ष २०२५-२६ मध्ये काही रचनात्मक आणि कंटेटचा आढावा घेतला जात असून कम्प्लायन्स सोपे करणे, पारदर्शकता वाढवणे, योग्य रिपोर्ट होणे यासाठी फेररचना सुरू आहे. या बदलांमुळे सिस्टिमची निर्मिती करणे, इंटिग्रेशन आणि संबंधित युटिलिटीजची चाचणी करण्यासाठी वेळ लागणार आहे. दरम्यान, टीडीएस विंडोद्वारे जी आकडेवारी ३१ मे २०२५ पर्यंत उपलब्ध होणे आवश्यक आहे ते सिस्टिममध्ये दिसण्यास जून महिन्यातील सुरुवातीचे काही दिवस लागतील त्यामुळे आयटीआर फायलिंगला मुदतवाढ दिली नसती तर त्यासाठी कमी वेळ मिळाला असता.

नोंदणीकृत आयटीआर मधील बदल लक्षात घेता आणि आयटीआर फायलिंगच्या युटिलिटी असेसमेंट वर्ष २०२५-२६ च्या पान १० वर

## नुकसानीचे पंचनामे तत्काळ करा : मुख्यमंत्री



**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील अतिवृष्टीमुळे उद्भवलेल्या परिस्थितीचा मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत आढावा घेण्यात आला. यावेळी शेती आणि घरांच्या नुकसानीचे तत्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

राज्य मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीत सुरुवातीलाच राज्यातील अतिवृष्टी, धरणांतील पाणीसाठा, पीक परिस्थिती याबाबतचा आढावा घेण्यात आला. आपत्ती व्यवस्थापनाशी निगडीत विविध यंत्रणांच्या सज्जतेची माहितीही मंत्रिमंडळाने घेतली.

राज्यात वीज पडून, भिंत कोसळून, झाड पडून, पाण्यात बुडून आठ जणांचा मृत्यू झाला आहे तर दोन जण जखमी झाले आहेत. या मृतांच्या नातेवाईकांना आवश्यक ती मदत आणि नियमानुसार आर्थिक मदत तत्काळ पोहोचवण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बैठकीत दिले. यावेळी झालेल्या चर्चेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, आपत्ती व्यवस्थापनमंत्री गिरीश महाजन, महिला आणि बालविकासमंत्री अदिती तटकरे, क्रीडा आणि युवक कल्याण दत्तात्रय भरणे, रोजगार हमीमंत्री भरत गोगावले, मत्स्य व्यवसाय आणि बंदरे विकासमंत्री निलेश राणे यांनी चर्चेत भाग घेतला.

राज्य आपत्कालीन कार्य केंद्रातून बचाव आणि मदतकार्यासाठी प्रभावी समन्वयन साधण्यात येत असल्याची माहिती मदत आणि पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव सोनिया सेठी यांनी सादरीकरणाद्वारे दिली.

'सचेत' प्रणालीवरून पाऊस, वीज सतर्कता याबाबत १९ कोटी २२ लाख मोबाईल लघुसंदेश पाठवण्यात आले. राज्य आपत्कालीन कार्य केंद्राला अत्याधुनिक संवाद यंत्रणा आणि आपत्तींच्या माहितीचे विश्लेषण करणाऱ्या डीएसएसने सुसज्ज करण्यात आल्याची माहिती सेठी यांनी दिली.

## मुख्यमंत्री अब्दुल्लांनी दिली ताकद

### पहलगामध्ये मंत्रिमंडळ बैठक

**श्रीनगर । वृत्तसंस्था**

पहलगामला लागून असलेल्या बैसरन पठारावर देशाच्या वेगवेगळ्या भागातून आलेल्या तब्बल २६ पर्यटकांची हत्या दहशतवाद्यांनी केली. या घटनेनंतर पहलगामवर मोठा आर्थिक आघात झाला. दहशतवाद्यांना कडक संदेश देण्यासाठी आणि येथील पर्यटनाला चालना मिळावी म्हणून मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी येथेच मंत्रिमंडळाची बैठक घेतली.

जम्मू-काश्मीरमध्ये पहिल्यांदाच पारंपरिक मंत्रिमंडळ बैठक श्रीनगर येथे न घेता मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी पहलगाम येथे घेतली. ही बैठक देशविरोधी आणि समाजविघातक शक्तींना एक कठोर संदेश देण्यासाठी आणि जम्मू-काश्मीरमध्ये हिंसेला अजिबात स्थान नसल्याचे सांगण्यासाठी घेण्यात आल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले. या बैठकीपूर्वी ओमर अब्दुल्ला यांनी नदीकाठी बसून वेळ घालवला. यावेळी त्यांनी काही फोटोही शेअर केले. पहिल्यांदाच पहलगाममध्ये झालेल्या या बैठकीबद्दल उपमुख्यमंत्री सुरिंदर चौधरी म्हणाले, 'पहलगाममध्ये कॅबिनेट पान १० वर

## शेती वाटपपत्र दस्तावरील नोंदणी शुल्क माफ

### राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय; महसुलात घट होणार

**मुंबई । प्रतिनिधी**

शेतजमिनीच्या वाटपपत्राच्या दस्तावर आकारण्यात येणारे नोंदणी शुल्क माफ करण्याचा निर्णय मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. या निर्णयामुळे राज्य सरकारच्या महसुलात दरवर्षी ३५ ते ४० कोटी रुपयांची घट येऊ शकते. मात्र शेतीच्या वाटपपत्राची नोंदणी न केल्यामुळे शेतकऱ्यांना होणाऱ्या त्रासातून सुटका करण्यासाठी नोंदणी शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला.

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ८५ नुसार शेतजमिनीचे वाटप करताना मोजणी करून वाटपाच्या दस्तास मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्क द्यावे लागते. शेतजमिनीच्या वाटपपत्रास मुद्रांक शुल्काचा दर नाममात्र आहे. मात्र नोंदणी शुल्काच्या बाबतीत सवलत नाही. मुद्रांक शुल्कापेक्षा नोंदणी शुल्क अधिक असल्याने अनेक शेतकरी दस्तांची नोंदणी करत नाहीत. नोंदणी न केल्यामुळे भविष्यात शेतजमिनीवर वाद निर्माण झाल्यास त्याचा शेतकऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना नाहक त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे अशा दस्तांना नोंदणी शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे शेतकऱ्यांना वाटपपत्राची नोंदणी सहजपणे करता येईल.

### विधी आणि न्याय विभागात टंकलेखकाची ५,२२३ नवीन पदे

राज्यातील प्रत्येक न्यायिक अधिकाऱ्यासाठी एक टंकलेखक यानुसार ५,२२३ टंकलेखकाची एकाकी पदे निर्माण करण्यास राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज मंजुरी देण्यात आली. राज्यात जिल्हा न्यायाधीश, दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर), दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) या संवर्गातील अधिकाऱ्यांची नवीन २,८६३ नियमित पदे निर्माण करण्यात आली आहेत. तसेच यापूर्वीची २,३६० पदे मंजूर आहेत. त्यामुळे राज्यात सध्या न्यायिक अधिकाऱ्यांची ५,२२३ पदे मंजूर आहेत. या सर्व टंकलेखकांच्या वेतनापोटी येणाऱ्या १९७ कोटी ५५ लाख ४७ हजार ५२० रुपयांच्या वार्षिक खर्चासही आज मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

### अन्य निर्णय

- पेण येथील सुहित जीवन ट्रस्टच्या एकलव्य प्रशिक्षण केंद्रास अनुदान
- इचलकरंजी, जालना महापालिकेला अनुक्रमे ६५७ कोटी, ३९२ कोटी
- महाराष्ट्र वनविकास महामंडळाच्या १,३५१ पदांच्या सुधारित आकृतिबंधास मंजुरी
- महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प संस्थेवर पणनमंत्री पदसिध्द अध्यक्ष
- कृषी पर्यवेक्षक आणि कृषी सहाय्यक यांच्या पदनामात बदल
- महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी
- उच्च प्राथमिक शाळांमध्ये अंशकालीन निदेशकांच्या नियुक्तीचे सुधारित धोरण

## पुन्हा नाशिकलाच पसंती

### पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या

- निरीक्षक सावंत, देसाईंचे पुनरागमन
- जुने व नवे अधिकारी दिसणार

**नाशिक । प्रतिनिधी**



महाराष्ट्र राज्य पोलीस महासंचालक कार्यालयाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक ते उपनिरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या नियुक्तीबाबत आदेश जारी केले असून नाशिकला नव्याने पाचहून अधिक नवे निरीक्षक मिळाले आहेत. दरम्यान, शहर पोलीस दलातील तीन पोलीस उपायुक्तांचा कार्यकाळ पूर्ण होत असून, आगामी सिंहस्थापूर्वी 'झोन' व 'अकार्यकारी' विभागाच्या प्रमुखपदाची सूत्रे हाती घेण्यासाठी काही इच्छुकांनी 'लॉबिंग' सुरू केली आहे. त्यातच नाशिकला यापूर्वी काम केलेल्यांसह अनेकांनी नाशिकलाच पसंती दिली असून काहींची लॉबिंग यशस्वी झाल्याचे समजते.

पोलीस महासंचालक कार्यालयाने मंगळवारी (दि.२७) राज्यातील अकार्यकारी पदांवर काम करणाऱ्यांसह निरीक्षक, सहाय्यक व उपनिरीक्षकांच्या बदल्यांचे आदेश जारी केले आहेत. यात गुन्हे अन्वेषण विभागातून (सीआयडी) नम्रता देसाई, सांगलीचे तानाजी सावंत यांची नाशिक शहर आयुक्तालयात बदली झाली आहे. तर देवीदास वांजळे यांना नाशिक शहरात एक वर्ष मुदतवाढ देण्यात आली आहे. दरम्यान, उपायुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश अद्याप जारी झालेले नाहीत. त्यामुळे पुढील टप्प्यात परिमंडळ एकचे उपायुक्त किरणकुमार चव्हाण, गुन्हे उपायुक्त प्रशांत बच्छाव, मुख्यालयाचे उपायुक्त चंद्रकांत खांडवी यांच्या बदलीची शक्यता आहे. हे तिघेही नोव्हेंबर २०२२ मध्ये नाशिक शहरात रुजू झाले होते. तर काही महिन्यांच्या अंतराने परिमंडळ दोनच्या उपायुक्त मोनिका राऊत यांची शहरात नियुक्ती झाली होती. दरम्यान, चौघांपैकी कोणाची कुठे बदली होणार याकडे त्यांच्या जागेवर नियुक्त होणाऱ्या अधिकाऱ्यांसंदर्भात चर्चा सुरू आहेत. यासह पूर्वी नाशिकमध्ये कार्यरत असलेल्या नम्रता देसाई आदेशानुसार शहर आयुक्तालयात रुजू होतील, तर लोहमार्ग विभागातून महेश कुलकर्णी हे नाशिक ग्रामीण पोलीस दलामध्ये रुजू होतील.